स्थापना 'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' २८ ऑगस्ट १९८९

# १७ वा वार्षिक अहवाल सन २००५-२००६



सर्वमंगलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते ॥

"जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक"

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या., अंबरनाथ

नोंदणी क्र. टी.एन्.ए./यू.एल.आर./आर.एस.आर.(सी.आर.)/३७४/१९८९-९०

प्रशासकीय कार्यालय : ३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पु.), जि. ठाणे - ४२१ ५०१.

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

## संचालक-मंडळ



श्री. हणमंत स. घनवट
अध्यक्ष



श्री. जयवंतराव बंडू काटकर
संस्थापक - संचालक



श्री. अविनाश ना. खानविलकर
उपाध्यक्ष



श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव



श्री. [illegible]
[illegible]



श्री. प्रकाश शं. पवार
संचालक



श्री. प्रकाश शं. पाटील
संचालक



सौ. मंगला श्रीधर ढाले
संचालिका



श्री. भगवान अ. ऊतेकर
संचालक



श्री. मनोहर पां. जाधव
संचालक



सौ. निलम अ. आंब्रे
संचालिका



श्री. बाबुराव ना. साठे
संचालक



श्री. महादेव वी. थोरे
संचालक



श्री. हरीश्चंद्र य. येरूणकर
स्विकृत संचालक



सौ. प्रिती प्र. नलावडे
स्विकृत संचालिका



श्री. विजय अ. पाटील
(बी.कॉम.जी.डी.सी. ॲण्ड ए)
अंतर्गत हिशोब तपासणीस



श्री. तुकाराम अं. शेडे
अंतर्गत हिशोब तपासणीस

## १७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ह्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **सतरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ६-८-२००६ रोजी सकाळी ९.३० वा. महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ (प.)** येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, हि विनंती.

## सभेपुढील विषय

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २००६ रोजी संपणाऱ्या सहकारी वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) दि. ३१ मार्च २००६ रोजी संपणाऱ्या सहकारी वर्षाच्या नफा विभागणी पत्रकास मंजूरी देणे.

४) सन २००६-२००७ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

५) सन २००६-२००७ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड करणे.

६) पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे. (सोबत उपविधी दुरुस्ती प्रकरण जोडले आहे.)

७) कल्याण व अंबरनाथ (प.) येथे शाखा सुरु करणेबाबत विचारविनिमय करणे.

८) कर्जाच्या थकबाकीवर विचार विनिमय करणे.

९) आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करणे.

अंबरनाथ.
दिनांक : १५-७-२००६

श्री. शशिकांत म. शिर्के
(सचिव)
श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या., अंबरनाथ
(संचालक मंडळाच्या परवानगीनुसार)

## सूचना

१) पुरेशा गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, त्याच विषयांवर सभा बोलविण्यात येईल. त्यास गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना कामकाजाविषयी प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना द्यावयाच्या असतील त्यांनी आपल्या सुचना अगर प्रश्न दि. ३-८-२००६ पूर्वी लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात आणून द्यावेत.

३) ज्या सभासदांनी सन २००३-०४ ते २००४-०५ चा लाभांश घेतला नसल्यास घेणे अन्यथा तो राखीव निधीत जमा केला जाईल याची नोंद घ्यावी.

४) सभेस येतांना सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.

# १७ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद, ठेवीदार, हितचिंतक बंधू भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

आपल्या पतसंस्थेचा १७ वा वार्षिक अहवाल सादर करताना संचालक मंडळास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. संचालक मंडळाचे सहकार्य, योग्य मार्गदर्शन, उत्कृष्ट नियोजन, पारदर्शक कामकाज व तत्पर सेवा या धोरमांमुळे संस्थेच्या प्रगतीचा आलेख कायम चढता राहीलेला आहे. महाराष्ट्र शासनाचे एन्. पी. ए. चे बदलते निकष याच वर्षापासून पहिल्यांदा लागू झाल्यामुळे तौलनिक स्थितीबद्दल गैरसमज निर्माण झाले आणि सहकारी बँकींग क्षेत्रात खळबळ माजली मात्र वस्तूस्थिती तशी नसून आपल्या सारख्या पतसंस्था चांगले काम करीत आहे.

ग्राहकांना उत्तम सेवा, ठेवीदारांना आश्वस्त करणारी अधिक भक्कम स्थिती, नियमित कर्ज वसुली आणि सभासदांना समाधानकारक लाभांश याकडे संचालक मंडळाचे सर्वाधिक लक्ष असते. ''ग्राहको देवो भवः'' यावर श्रद्धा ठेवून त्यांचे हित जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न होत राहील्यानेच ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यात संस्थेला आजचे यश प्राप्त झाले आहे. समाजाला परमेश्वर मानून आपदग्रस्त व दीन-दुबळ्या लोकांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी ''सहकाराच्या माध्यमातून'' श्री महालक्ष्मी पतसंस्था कार्यरत आहे. निरपेक्ष समाजसेवेच्या व्रताची पूर्तता करण्यासाठी आम्ही आपणा सर्वांचे सहकार्याने श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली आहे. सर्व समाजाला सोबत घेऊन यशाकडे अखंड झेप घेण्याचे उदात्त ध्येय आम्ही समोर ठेवले आहे. कोणत्याही संस्थेची यशस्वी वाटचाल समाजातील असुयाग्रस्त प्रवृत्तींना असह्य होते. स्वार्थी हेतूने त्या अधून मधून डोके वर काढीत असतात. श्री महालक्ष्मी पतसंस्थेचे हित जपणे हेच आपले कर्तव्य आहे. ते पार पाडीत असताना उपरोक्त आपप्रवृत्तीपासून आपण सदैव दूर राहिले पाहीजे. आपले ऋण व आभार व्यक्त करताना आपल्या पतसंस्थेच्या सांपत्तिक स्थितीचा आलेख प्रस्तुत करणे योग्य ठरेल.

**आर्थिक वर्ष २००५-०६ आढावा -**

सन २००५-०६ या आर्थिक वर्षात सर्व सभासद व ठेवीदार यांच्या भरघोस पाठींब्यावर आपल्या संस्थेस प्रगती साधता आली हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

| तपशील | २००५ - २००६ | २००४ - २००५ | % वाढ |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | ६८,४१,५७०.०० | ५५,८५,२५०.०० | २२.४८% |
| स्वनिधी | २०,६४,७२३.०० | १८,८३,५०९.०० | ९.६२ % |
| ठेवी | ५,१९,००,६५३.०० | ४,०५,९७,३००.०० | २७.८४ % |
| कर्जे | ४,२३,५५,२१३.०० | ३,४१,१९,५११.०० | २४.१३ % |
| गुंतवणूक | १,७३,९८,४००.०० | १,३०,६२,४००.०० | ३३.१९ % |
| एकूण उत्पन्न | ६९,७३,०७७.०० | ५८,१७,९८६.०० | १९.८५% |

**१) सभा -**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा झाल्या असून संस्थेचे दैनंदिन कामकाज, सहकारी कायद्यानुसार व संस्थेच्या पोटनियमांना अनुसरुन सर्वसामान्य सभासदांच्या आर्थिक गरजांचे निवारण करण्यासाठी व संस्थेचे ध्येय धोरणे आखण्यासाठी संस्थेचे संचालक मंडळ कार्यरत आहे. त्याचप्रमाणे कर्ज वसुली समिती, ठेव संकलन समिती यांच्या प्रत्येक महिन्याला शाखानिहाय सभा घेऊन कर्ज वसुलीबाबत आढावा घेतला जातो. जेणेकरुन थकबाकीचे प्रमाण अत्यल्प राहिल. तसेच ठेव वृद्धी बाबत निरनिराळे उपाय-योजना आखून ठेवींचा ओघ कायम चढता राहील. असा प्रयत्न केला जातो. सभांना संचालक मंडळ सदस्यांची उपस्थिती उल्लेखनीय असते.

**२) सभासद -**

अहवाल वर्षाच्या सुरवातीस एकूण २०२२ सभासद होते. त्यामध्ये ४६८ नवीन सभासदांची वाढ झाली व १०० सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे वर्षाअखेरीस संस्थेचे एकूण २३९० सभासद आहेत.

**३) भाग भांडवल -**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. एक कोटी असून मागील वर्षाअखेर संस्थेचे रु. ५५,८५,२५०.०० इतके वसुल भागभांडवल होते. अहवाल वर्षात रु. १६,४७,९३०.०० जमा झाले असून राजीनामा दिलेल्या सभासदांना रु. ३,९१,६१०.०० इतके भाग भांडवल परत केल्याने, वर्षाअखेरीस पतसंस्थेकडे एकूण वसूल भागभांडवल रु. ६८,४१,५७०.०० जमा झालेले आहे.

**४) निधी -**

**अ) राखीव निधी -** अहवाल सालाच्या सुरुवातीस राखीव निधीमध्ये रु. ९,९२,२४६.०० जमा होते सन ०५-०६ अखेरीस त्यात वाढ होऊन एकूण रुपये १२,१८,७८९.०० राखीव निधी जमा आहे.

**ब) इतर निधी -** सन २००५-०६ मध्ये इतर निधी रु. ८,४५,९३४.०० इतका जमा आहे.

**५) ठेवी -**

संस्थेच्या असंख्य ठेवीदारांनी पतसंस्थेवर टाकलेल्या विश्वासामुळे संस्थेच्या प्रगतीची घोडदौड कायम राखण्यात यश मिळाले आहे. अहवाल वर्षात आलेल्या अतिवृष्टीने झालेल्या पूरसदृष्य परीस्थितीमुळे ठेवींचा ओघ काहीसा मंदावला होता परंतू संचालक मंडळाने दूरदृष्टी दाखवून ठेव संकलन सप्ताहाचे आयोजनाचा धोरणात्मक निर्णय घेतला आणि ठेवीदारांनी त्यास भरघोस प्रतिसाद देऊन अहवाल वर्षात संस्थेच्या ठेवींमध्ये २७.८४ % नी वाढ होऊन वर्षाअखेरीस एकूण ठेवी रु. ५,१९,००,६५३.०० इतक्या झाल्या आहेत. संस्थेच्या विविध ठेवयोजनांमध्ये आपण सामील होऊन आपल्या विकासाबरोबर संस्थेच्या विकासास हातभार लावावा.

ठेवीची विगतवारी पुढीलप्रमाणे -

| ठेव योजनांचे नांव | ठेव रुपये |
|---|---|
| मुदत ठेव | २,३५,६२,००५.०० |
| दामदुप्पट ठेव | ५६,३९,५७६.०० |
| मासिक मिळकत ठेव | ५४,१६,०००.०० |
| दैनंदिन ठेव | १३३,७९,०६४.०० |
| मासिक ठेव | २३,४१,१७१.०० |
| बालविकास ठेव | ६१,०००.०० |
| जनविकास ठेव | ३,६६,८५०.०० |
| लखपती ठेव | २,२३,५८१.०० |
| बचत ठेव | ७,१७,८७२.०० |
| इतर ठेवी | १,९३,५३४.०० |
| एकूण ठेवी | ५,११,००,६५३.०० |







## ६) कर्जवाटप -

सहकारी कायदा, नियम व पोटनियम यांस सुसंगत असे कर्ज धोरण संचालक मंडळाने स्वीकारले आहे. त्यानुसार लघुउद्योग, छोटे-छोटे व्यापारी यांना जामीनकी कर्जे तसेच विविध प्रकारची तारण कर्जे दिली जातात. सभासदांच्या व ग्राहकांच्या एकूण आर्थिक परीस्थितीचा व कर्जपरत फेडीच्या क्षमतेचा अभ्यास करुन कर्जवाटप केले आहे.

| कर्ज प्रकार | कर्जवाटप रु. |
|---|---|
| मध्यम मुदत कर्ज | १,८४,६८,७४८.०० |
| दैनंदिन ठेव कर्ज | ४१,२४,९०६.०० |
| वाहन तारण कर्ज | १,९५,४५७.०० |
| गृह तारण कर्ज | १३,४८,४५९.०० |
| वस्तूखरेदी तारण कर्ज | ८,५३,०७८.०० |
| सोनेतारण कर्ज | ३९,९२,१८२.०० |
| मुदत ठेव तारण कर्ज | ६२,८८,०२८.०० |
| एन. एस. सी. तारण कर्ज | ४,४४,०००.०० |
| व्यवसाय कर्ज | ३,००,०००.०० |
| नाममात्र सभासद कर्ज | १०,५८,२००.०० |
| एकूण कर्ज वाटप | ३,७०,७३,०५८.०० |



**७) कर्जवसुली -**

सन २००४-०५ अखेर रु. ३,४१,१९,५११.०० कर्ज येणे बाकी होते अहवाल सालात रु.३,७०,७३,०५८.०० इतके कर्जवाटप झाले आहे. त्यापैकी रुपये २८८,३७,३५६.०० इतके कर्ज वसूल झाले आहे. अहवाल वर्षाअखेर रुपये ४,२३,५५,२१३.०० इतके कर्ज येणे बाकी आहे. चालू आर्थिक वर्षापासून मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांनी पतसंस्थाना एन्.पी.ए. चे निकष लागू केल्याने त्याची गंभीर दखल घेऊन कर्जवसुलीचे काम नेटाने मार्गी लावले. त्या अनुषंगाने **पतसंस्थेने २४ कर्ज थकबाकीदारांवर कलम १०१ अंतर्गत कारवाई करुन वसुली दाखले मिळविले आहेत.** संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसूली समिती व कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदारांना व त्यांच्या जमीनदारांशी संपर्क साधून कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे संस्थेच्या वसुलीच्या कामास गती आली आहे.

**८) ठेवींवरील देय व्याजाची तरतूद -**

ठेवींवरील देय व्याजाची तरतूद सन २००५-२००६ या अहवाल वर्षात मुदतपूर्ण झालेल्या व या आर्थिक वर्षात जमा झालेल्या परंतू भविष्यात मूदतपूर्ण होणाऱ्या ठेवींसाठी रु. ३१,४२,७७५/- व्याजाची तरतूद केली आहे.

**९) गुंतवणूक -**

अहवाल वर्षात सुरुवातीस राखीव निधी व मुदत ठेवीपोटी विविध बँकांमध्ये एकूण रु. १,३०,६२,४००.०० गुंतवणूक केली होती. संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत राहण्याच्या दृष्टीने तसेच सहकारी खात्याने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार ठेवी व कर्जे यामध्ये तरलता साधण्याच्या दृष्टीकोनातून अहवाल सालात रु. ४३,३६,०००.०० इतकी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे संस्थेची एकूण रु. १,७३,९८,४००.०० एवढी गुंतवणूक दि ठाणे जि. मध्य. सह. बँक लि., दि सारस्वत को. ऑप. बँक लि. व अन्य सह. बँकांमधून (शेड्यूल्ड) ठेवीद्वारे केली आहे.

**१०) नफा -**

अहवाल वर्षात संस्थेस एकूण खर्च व तरतुदी वजा जाता रु. ७,७०,९९५.५० इतका नफा झाला आहे. सदर नफ्यातून संचालक मंडळाने कायदेशीर व धोरणात्मक नफा वाटणी सुचविली आहे.

११) शाखा निहाय सांपत्तिक स्थिती -

| शाखा | भाग भांडवल | ठेवी | कर्ज | व्याज वसूल |
|---|---|---|---|---|
| अंबरनाथ | ४१,८५,३४० | ३,३३,९१,१३८ | १,८३,३९,५९९ | २७,७१,०३३ |
| बदलापूर | २०,३७,९१० | १,२५,६३,६८४ | १,९१,१९,४०० | २३,१२,९४९ |
| डोंबिवली | ६,१८,३२० | ५९,४५,८३१ | ४८,९६,२१४ | ५,६८,१६८ |

१२) विशेष उल्लेखनीय -

अहवाल वर्षात झालेल्या अतिवृष्टीने आपल्या कार्यक्षेत्रातील परीसरातील जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले होते. बदलापूर वासीयांना आपले संसार, उद्योगधंदे नव्याने सुरु करणे गरजेचे होते त्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज होती. तेव्हा त्यांना त्वरीत पतपुरवठा करुन सहकार्य केले. तसेच सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेने पूरग्रस्त विभागातील विद्यार्थ्यांना श्री महालक्ष्मी पतपेढीतर्फे **मोफत वह्यांचे वाटप केले.**

श्री. महालक्ष्मी पतसंस्थेने दि. १९-६-२००६ रोजी संचालक, कर्मचारी व ठेव वसुली प्रतिनिधी यांचेसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते. शिबीराचे व्याख्याते दि सारस्वत को. ऑप. बँक लि. यांचे ट्रेनिंग कॉलेजचे प्राध्यापक श्री. भालचंद्र कुलकर्णी होते. प्रशिक्षणवर्गामध्ये ग्राहक सेवा, व्यवसायवृद्धी आणि एन.पी.ए. बाबत सविस्तर माहिती सादर केली. त्याचा भविष्यकाळात पतसंस्थेस नक्कीच फायदा होईल.

आपल्या पतसंस्थेतर्फे सभासद कल्याण निधीतून मयत सभासदांच्या वारसांना रु. १०००/- ची तातडीची आर्थिक मदत दिली जाते. तरी सभासद मयत झालेपासून एक महिन्याच्या आत योग्य कागदपत्रासह अर्ज करुन आर्थिक मदत मिळवावी.

१२) श्रद्धांजली -

अहवाल वर्षात देशातील जे राजकीय, सामाजिक, सहकार, कला व साहित्य क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, अशा थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.



**१२) आभार -**

आपल्या पतसंस्थेस वेळोवेळी ज्या-ज्या व्यक्तिंनी सहकार्य दिले त्यांचा ऋणनिर्देश करणे क्रमपात्र ठरेल.

मा.श्री. मिलिंद नि. बोरीकर जिल्हा उपनिबंधक सह. संस्था ठाणे व त्यांच्या कार्यालयातील मा.श्री.जी.बी. ठाकूर व इतर अधिकारी वर्ग, मा. श्री. प्रताप पाटील सहा. निबंधक सह. संस्था उल्हासनगर तालुका, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. चे अध्यक्ष मा. श्री. ललितजी गांधी, मुंबई/ठाणे जिल्हा सह. बोर्ड लि. चे शिक्षण निधी वसुली अधिकारी श्री. एच. जी. शेटे साहेब, मा. श्री. व्ही. व्ही. देसाई मुख्याधिकारी प्रशिक्षण विभाग महा. राज्य सह. संघ. सहकार प्रशिक्षण केंद्र नाशिक चे प्राचार्य श्री. पी. के. कापडणीस, ठाणे नागरी/पगारदार सह. पतसंस्था फेडरेशनचे मा. अध्यक्ष, सचिव व पदाधिकारी तसेच विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री. प्रकाश निकम यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार त्याचप्रमाणे मा. दादासाहेब नलावडे माजी नगराध्यक्ष अंबरनाथ नगरपरीषद, मा. श्री. सोनजे सर मुख्याध्यापक महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ, मा. श्री. रामराव मोरे सर मुख्याध्यापक भाऊसाहेब परांजपे विद्यालय, तसेच पोलीस स्टेशन अंबरनाथ, बदलापूर व डोंबिवली यांनी वसुलीकामी विशेष सहकार्य केल्याबद्दल आभार. पतसंस्थेची संगणक कार्यप्रणाली कार्यान्वित करणारे गुरु कन्सल्टंटचे संचालक श्री. संतोष परुळेकर आणि अधिकारी वर्ग, दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक., दि सारस्वत को. ऑप. बँक, डोंबिवली ना. सह. बँक, जनकल्याण सह. बँक ठाणे, अंबरनाथ जयहिंद को. ऑप .बँक, देना बँक लि. तसेच कार्यक्षेत्रातील सर्व सह. पतसंस्था यांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्गाचे सहकार्याबद्दल आभार.

अंतर्गत हिशोबतपासनीस श्री. विजय अ. पाटील व श्री. तुकाराम अं. शेंडे यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल मी खास ऋण व्यक्त करतो.

संस्थेचे कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचा प्रामाणिकपणा व अथक परीश्रमांतून ह्या संस्थेची भरभराट होत असल्याची जाणीव मी येथे खास नमुद करतो. पतसंस्थेचा उत्कर्ष असाच चालू रहावा ही सदिच्छा व्यक्त करुन मी हा अहवाल पूर्ण करतो.

जयहिंद ! जय सहकार !!

आपला

श्री. हणमंत सदाशिव घनवट

(अध्यक्ष)

श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या. अंबरनाथ



# श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या., अंबरनाथ.

## ताळेबंद

| रक्कम रु. २००४-०५ | जबाबदाऱ्या व देणे | | रक्कम रु. २००५-०६ |
|---|---|---|---|
| १,००,००,०००.०० | अधिकृत भाग भांडवल | | १००,००,०००.०० |
| ५५,८५,२५०.०० | वसुल भाग भांडवल | | ६८,४१,५५०.०० |
| ९,५६,९३१.०० | **राखीव निधी** | ११,८३,५२१.०० | |
| ५,११०.०० | प्रवेश फी | ४,६४०.०० | |
| १९,६५०.०० | नाममात्र सभासद फी | १७,९३०.०० | |
| ११,२७५.०० | लाभांश वर्ग | १२,६९८.०० | १२,१८,७८९.०० |
| ८,९१,२६३.०० | **इतर निधी** | | |
| ४२३,४९०.०० | इमारत निधी | ५,५४,४६५.०० | |
| २९,११७.०० | लाभांश समीकरण निधी | ३१,११७.०० | |
| १६,६१५.०० | सभासद कल्याण निधी | २५,६१५.०० | |
| ३,५३,७४८.०० | संशयीत व बुडीत कर्ज निधी | १,७४,४४४.०० | |
| ३२,०००.०० | रौप्य महोत्सव निधी | ४२,०००.०० | |
| १६,२१३.०० | धर्मदाय निधी | १८,२१३.०० | |
| २०,०००.०० | निवडणूक निधी | --------- | ८,४५,९३४.०० |
| ४,०५,९७,३००.०० | **ठेवी** | | |
| १६५,००,२३९.०० | **मुदत ठेव** | २,३५,६२,००५.०० | |
| ५४,०४,३७४.०० | दामदुप्पट ठेव | ५६,३९,५७६.०० | |
| ४७,६६,५००.०० | मासिक मिळकत ठेव | ५४,१६,०००.०० | |
| १०३,८०,८५१.०० | दैनंदिन ठेव | १,३३,७९,०६४.०० | |
| २५,६१,६४१.०० | मासिक ठेव | २३,४१,१७१.०० | |
| ७४,७००.०० | बालविकास ठेव | ६१,०००.०० | |
| १,६९,४००.०० | जनविकास ठेव | ३,६६,८५०.०० | |
| ----- | लखपती ठेव | २,२३,५८१.०० | |
| ६,१३,५१६.०० | बचत ठेव | ७,१७,८७२.०० | |
| १,२६,०७९.०० | इतर ठेवी | १,९३,५३४.०० | ५,१९,००,६५३.०० |
| ३०,६१,३६२.०० | **देणी व तरतुदी** | | |
| ------- | थकित कर्ज तरतुद (N.P.A.) | १०९५९८९.०० | |
| २८,२९,३१६.०० | देणे ठेवीवरील व्याज | ३१,४२,७७५.०० | |
| ३२,०००.०० | देणे ऑडीट फी | ४०,०००.०० | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | |
| ५१,९९९.०० | देणे कर्मचारी बोनस | ६३,०५३.०० | |
| ३०,२०२.०० | देणे कर्मचारी भविष्य नि. निधी | ८१,८३८.०० | |
| १,४३५.०० | देणे व्याज कर्मचारी भविष्य नि. निधी | ३,४३५.०० | |
| ३,६८०.०० | देणे अनामत | २५,७७२.०० | |
| १,०७,७३०.०० | देणे लाभांश | २,१८,०३७.०० | ४६,७५,८९९.०० |
| ७,६५,२६६.०० | **नफा** | | |
| १६४.६० | शिल्लक नफा (सन ०४-०५) | ४१५.०० | |
| ७,६५,१०१.४० | चालू नफा (सन ०५-०६) | ७,७०,९९५.५० | ७,७१,४१०.५० |
| ५,१८,९२,६८७.०० | | | ६,६२,५४,२५५.५० |

**श्री. शशिकांत म. शिर्के**
सचिव

**श्री. शंकर जी. शेलवले**
खजिनदार

## पत्रक (३१.३.२००६ अखेर)

| रक्कम रु. २००४-०५ | संपत्ती व येणे | | रक्कम रु. २००५-०६ |
|---|---|---|---|
| १०,७३,२५५.०० | रोख शिल्लक | | १८,२४,७३२.०० |
| २०,१६,२६५.०० | बँक शिल्लक | | २६,१६,६७२.५० |
| १,३०,६२,४००.०० | गुंतवणूक | | १,७३,९८,४००.०० |
| ३,४१,१९,५११.०० | कर्जे | | |
| १,९९,१४,७०४.०० | मध्यम मुदत कर्ज | २,५०,७५,१७३.०० | |
| २४,२६,९४४.०० | दैनंदिन ठेव कर्ज | २७,६२,४७६.०० | |
| ३०,५०,३८९.०० | मुदत ठेव तारण कर्ज | ४९,४२,०४४.०० | |
| २,७६,६५०.०० | एन.एस.सी.तारण कर्ज | ५,६६,५६७.०० | |
| २,९४,६८७.०० | वस्तू खरेदी तारण कर्ज | ७,७३,९६०.०० | |
| १७,३८,४४०.०० | सोने तारण कर्ज | २३,५७,५३८.०० | |
| १३,२२,६५१.०० | गृह तारण कर्ज | २१,१४,३७४.०० | |
| १८,०१,९३४.०० | वाहन तारण कर्ज | ९,६०,६३५.०० | |
| ११,०००.०० | मालतारण कर्ज | ८,५००.०० | |
| ३१,३३,७४०.०० | नाममात्र सभासद कर्ज | २५,१७,२७६.०० | |
| १,४८,३७२.०० | व्यवसाय कर्ज | २,७६,६७०.०० | ४,२३,५५,२१३.०० |
| ६,७०,६६८.०० | स्थावर मालमत्ता (इमारत) | ६,७०,६६८.०० | |
| | झीज | - १६,७६७.०० | ६,५३,९०१.०० |
| ३,८४,४९६.०० | फर्निचर व डेडस्टॉक | ३८४४९६.०० | |
| | चालू खरेदी | + ८९५०२.०० | |
| | झीज | - ४७,४००.०० | ४,२६,५९८.०० |
| ३३,४५६.०० | संगणक प्रणाली | ३३४५६.०० | |
| | चालू खरेदी | + १०४९३०.०० | |
| | झीज | - ३३,४५६.०० | १,०४,९३०.०० |
| २,५२,५००.०० | कार्यालय डिपॉझिट | | ५,०२,०००.०० |
| ६,०००.०० | टेलिफोन अनामत | | ६,०००.०० |
| ३७०.०० | वीज अनामत | | ३७०.०० |
| ५,३५०.०० | अधेसिव्ह स्टॅम्प | | ९,७३०.०० |
| १,५७,७१६.०० | स्टेशनरी साठा | | २,४०,१५०.०० |
| १,१०,७००.०० | येणे ॲडव्हान्स | | ९०,६८०.०० |
| --------- | येणे १०१ कारवाई खर्च | | २४,८७९.०० |
| ५,१८,९२,६८७.०० | | | ६,६२,५४,२५५.५० |

**श्री. अविनाश ना. खानविलकर**
उपाध्यक्ष

**श्री. हणमंत स. घनवट**
अध्यक्ष

# उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२००५ ते ३१/३/२००६ अखेर

| रक्कम रुपये २००४-०५ | खर्च | रक्कम रुपये २००५-०६ | रक्कम रुपये २००४-०५ | उत्पन्न | रक्कम रुपये २००५-०६ |
|---|---|---|---|---|---|
| ७१९०.०० | वार्षिक सा. स. खर्च (अहवाल छपाई) | ३५,२८५.०० | ४७,३५,६७९.०० | कर्ज व्याज वसूल | ५६,५२,१५०.०० |
| ३५१३६.०० | किरकोळ खर्च | ३५,९२०.०० | ९९४,०२५.०० | बँक व्याज (ठेवीवरील) | १२,०५,६८१.०० |
| २४२५९.०० | प्रवास खर्च | २६,५३६.०० | ४२,८९४.०० | नोटीस फी वसूल | ६०,७५५.०० |
| ३५०८४.०० | टेलिफोन खर्च | ३९,०८९.०० | २५,१६६.०० | प्रोसेसिंग फी | ४८,९५५.०० |
| १०७७३.०० | जाहिरात खर्च | १४,३९६.०० | २०,२०७.०० | सेवाशुल्क | ५,५२१.०० |
| २०९४३.०० | ऑफिस मेंटनन्स खर्च | २४,७२४.०० | १५.०० | बँक लाभांश | १५.०० |
| २५८४५.०० | वीज बिल | ३९,३८०.०० | | | |
| ९६०४.०० | दसरा / लक्ष्मीपूजन खर्च | ६,९०८.०० | | | |
| ६८६७.०० | सामाजिक उपक्रम | ६,६६१.०० | | | |
| ३५५०.०० | सहकार प्रशिक्षण खर्च | १,३००.०० | | | |
| ८१३५.०० | विमा खाते | ९,५९९.०० | | | |
| ३४३०.६० | बँक चार्जेस | ३,६१०.५० | | | |
| ८८३५.०० | पोस्टेज व टेलिग्राम | २०,५८४.०० | | | |
| ८५५.०० | संगणक दुरुस्ती | २,१५५.०० | | | |
| २०,०००.०० | निवडणूक निधी | ----- | | | |
| ------ | निवडणूक खर्च | १६,९००.०० | | | |
| ------ | महाराष्ट्र रा. फेड प्रवेश फी | ५०.०० | | | |
| ------ | फेड. वर्गणी | १,६००.०० | | | |
| ३००००.०० | कार्यालय भाडे | ४३,२५०.०० | | | |
| ------- | आपत्कालीन खर्च | १२,९७१.०० | | | |
| ६३८६.०० | मुख्यमंत्री सहा. निधी (सुनामी) | ------ | | | |
| ------ | पुरग्रस्त मदत | १०,२००.०० | | | |
| ------ | ठेव संकलन सप्ताह | २५,०६०.०० | | | |
| ६८५९५२.०० | ठेव कमिशन | ७,८०,५५५.०० | | | |
| ४३१५१७.०० | कर्मचारी वेतन | ५,०४,४२२.०० | | | |
| ५२०००.०० | सानुग्रह अनुदान | ६०,४४१.०० | | | |
| ६८५०.०० | संचालक भत्ता | ७,९५०.०० | | | |
| ३०००.०० | सचिव मानधन | ३,०००.०० | | | |
| ९०००.०० | अंतर्गत हि. त. मानधन | ९,०००.०० | | | |
| ५०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | | | |
| ३२३३३३७.०० | देणे ठेवीवरील व्याज | ३४,०५,३१६.०० | | | |
| २२७४३३.०० | थकीत कर्ज तरतुद | ८,७३,६८५.०० | | | |
| १७१९६.०० | इमारत घसारा | १६,७६७.०० | | | |
| ४२७२२.०० | फर्निचर घसारा | ४७,४००.०० | | | |
| ३३४५७.०० | संगणक घसारा | ३३,४५६.०० | | | |
| १५१०१.०० | देणे कर्म. भविष्य नि. निधी | २५,८१८.०० | | | |
| १४३५.०० | देणे कर्म. भविष्य नि. निधी व्याज | २,०००.०० | | | |
| ३१९९२.०० | ऑडिट फी | ४३,२५८.०० | | | |
| ------ | टॅक्स ऑडिट फी | ७,८३५.०० | | | |
| ७६५१०१.४० | निव्वळ नफा | ७,७०,९९५.५० | | | |
| ५८,१७,९८६.०० | एकूण | ६९,७३,०७७.०० | ५८,१७,९८६.०० | एकूण | ६९,७३,०७७.०० |

| श्री. शशिकांत म. शिर्के | श्री. शंकर जी. शेलवले | श्री. अविनाश ना. खानविलकर | श्री. हणमंत स. घनवट |
|---|---|---|---|
| सचिव | खजिनदार | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# नफा विभागणी पत्रक

सन २००५ - २००६

| अ.क्र. | तपशील | | नफा विभागणी रक्कम | एकूण नफा |
|---|---|---|---|---|
| १ | मागील शिल्लक नफा | ४९५.०० | | |
| | अधिक चालू वर्षाचा नफा | ७,७०,९९५.५० | | ७,७१,४९०.५० |
| २ | राखीव निधी २५ % | | १,९२,७४९.०० | |
| ३ | लाभांश समीकरण निधी | | २,०००.०० | |
| ४ | रौप्य महोत्सव निधी | | ५,०००.०० | |
| ५ | धर्मदाय निधी | | २,०००.०० | |
| ६ | सभासद कल्याण निधी | | ४,०००.०० | |
| ७ | लाभांश ९% प्रमाणे | | ५,६५,०९०.०० | |
| ८ | शिल्लक नफा | | ५७१.५० | |
| | एकूण रुपये | | ७,७१,४९०.५० | ७,७१,४९०.५० |

| श्री. शशिकांत म. शिर्के | श्री. शंकर जी. शेलवले | श्री. अविनाश ना. खानविलकर | श्री. हणमंत स. घनवट |
|---|---|---|---|
| सचिव | खजिनदार | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# अंदाज पत्रक

सन २००६ - २००७

| उत्पन्न | रक्कम रुपये | खर्च | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज वसूल | ६९,२०,०००.०० | किरकोळ खर्च | ४२,०००.०० |
| बँक व्याज | १३,००,०००.०० | प्रवास खर्च | ३५,०००.०० |
| नोटीस फी | ७५,०००.०० | संचालक भत्ता | ७,५००.०० |
| बँक लाभांश | १५.०० | विमा खाते | ९,०००.०० |
| सेवा शुल्क / प्रो. चार्जेस | ७०,०००.०० | छ. ले. सा. | २,००,०००.०० |
| | | कर्मचारी वेतन | ७,२०,०००.०० |
| | | जाहीरात खर्च | १५,०००.०० |
| | | टेलिफोन खर्च | ५०,०००.०० |
| | | दै. ठेव कमिशन | १४,२०,०००.०० |
| | | ऑ. मेंटनंस खर्च | ६०,०००.०० |
| | | वीज बील | ५५,०००.०० |
| | | कार्यालय भाडे | ५०,०००.०० |
| | | वकील फी | ५,०००.०० |
| | | पोस्टेज | १५,०००.०० |
| | | दसरा / लक्ष्मीपूजन खर्च | १५,०१५.०० |
| | | सानुग्रह अनुदान | ६५,०००.०० |
| | | वा. सा. सभाखर्च | ४०,०००.०० |
| | | शिक्षण निधी | ५,०००.०० |
| | | अं.हि.त. मानधन | ९,०००.०० |
| | | ऑडीट फी | ५०,०००.०० |
| | | सचिव मानधन | ३,०००.०० |
| | | सहकार प्रशिक्षण खर्च | ५,०००.०० |
| | | मालमत्ता कर | २०,०००.०० |
| | | देणे ठेवीवरील व्याज | ४६,४४,५००.०० |
| | | अपेक्षित नफा | ८,२५,०००.०० |
| एकूण | ८३,६५,०१५.०० | एकूण | ८३,६५,०१५.०० |

**श्री. शशिकांत म. शिर्के** सचिव

**श्री. शंकर जी. शेलवले** खजिनदार

**श्री. अविनाश ना. खानविलकर** उपाध्यक्ष

**श्री. हणमंत स. घनवट** अध्यक्ष

## उपविधी दुरुस्तीचा नमुना

| पोटनियम | सध्याचा पोटनियम | पोटनियम दुरुस्ती | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| ..... | मा. सहकार आयुक्त यांचे जा. क्रं. / ना. बँका / डी-४ आदर्श उपविधी / स्वीकृती / २००२ दि. १८-१२-२००२ अन्वये पतसंस्थांसाठी लागू केलेले सुधारीत आदर्श उपविधी (निवडणूक नियमावली सह) | मा. सहकार आयुक्त यांचे जा. क्र. / ना. बँका / डी-४ आदर्श उपविधी / स्वीकृती / दुरुस्ती / २००४ दि. २९-०९-२००४ अन्वये पतसंस्थांसाठी लागू केलेले सुधारीत आदर्श उपविधी (निवडणूक नियमावली सह) अन्वये मंजूर सुधारणांसह | मा. सहकार आयुक्त यांचे जा. क्र. / ना. बँका / डी-४ आदर्श उपविधी / स्वीकृती / दुरुस्ती / २००४ दि. २९-०९-२००४ मधील निर्देशानुसार कामकाज होणेसाठी |

## अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेल्या सन २००५-२००६ च्या तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंदाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व नियम आणि संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरण पत्रांशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा सन १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

स्थळ : अंबरनाथ

दिनांक : १ जून २००६

## अंतर्गत हिशोब तपासणीस

**श्री. विजय अमृत पाटील**
बी. कॉम., जी.डी.सी. ॲण्ड ए.

**श्री. तुकाराम अंबाजी शेंडे**

## * बँकर्स *

- दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., अंबरनाथ, बदलापूर
- डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., अंबरनाथ
- अंबरनाथ जयहिंद को. ऑप. बँक लि., अंबरनाथ, बदलापूर
- जनकल्याण को. ऑप. बँक लि., ठाणे
- सारस्वत को. ऑप. बँक लि., कल्याण-डोंबिवली
- देना बँक, डोंबिवली



## * कर्मचारी *

| | | |
|---|---|---|
| श्री. सुनिल हणमंत घनवट | श्री. आनंदा विठठल पाटील G.D.C. & A. | श्री. पाडुरंग श्रीपती पाटील |
| श्री. संदेश चंद्रकांत परब | श्री. नाथा बाबुराव लोटके | कु. निलिमा सूर्यकांत दिवाकर |
| श्री. सुशील एस्. जामसंडेकर | श्री. विनोद दादाजीराव कदम | श्री. गौरव एम्. कबीर |
| श्री. सुबोध कृष्णा भोसले | कु. अनिता वसंत पवार | श्री. सचिन महादेव मौर्य |
| कु. संयोगिता अनंत आंब्रे | श्री. संतोष श्रीपती पाटील | श्री. सुनील दत्तात्रय दहीफळे |
| श्री. प्रकाश हरिश्चंद्र व्यापारी | श्री. शितल शांताराम तरे | श्री. मेघा समीर मिरकुटे |



## * कार्यालयीन वेळ *

| | | |
|---|---|---|
| अंबरनाथ कार्यालय | : | मंगळवार ते रविवारं सकाळी ९.०० ते १२.०० व संध्या. ४.३० ते ७.३० वा. |
| बदलापूर शाखा | : | मंगळवार ते रविवार स. १०.३० ते १.३० व संध्या. ४.३० ते ७.३० वा. |
| डोंबिवली शाखा | : | मंगळवार ते रविवार स. १०.३० ते १.३० व संध्या. ४.३० ते ७.३० वा. |

## ✲ सभासदांसाठी सूचना ✲

१) आपला पत्ता बदलला असल्यास नविन पत्ता पूर्ण तपशीलासह संस्थेस कळवावा.

२) आपल्या वारसदारांची नोंद संस्थेच्या कार्यालयात वेळीच करून घेण्यात यावी.

३) आपला शिल्लक लाभांश संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावा.

४) आपली बचत, दैनंदिन,आवर्त,मुदत ठेव, खाती संस्थेत उघडून सहकार्य करावे.

५) आपल्या कर्जाची थकबाकी होणार नाही यांची काळजी घ्यावी.

६) वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या १० वी १२ वी व पदवी परिक्षा प्रथम प्रयत्नात पास झालेल्या मुलांचा सत्कार आयोजित केला आहे. त्यासाठी अशा विद्यार्थ्यांची नावे संस्थेच्या कार्यालयात त्यांच्या प्रमाण पत्राच्या प्रतीसह दि. ०१.०८.०६ पुर्वी नोंदणे आवश्यक आहे.

७) दर सोमवारी संस्थेचे कार्यालय बंद राहील.

८) एखाद्या महिन्यात जर कार्यालयीन रजा १५ तारखेस असेल तर त्या महिन्याची १६ तारीख ही हप्ता भरण्याची अखेरची तारीख असेल.

---

## हार्दिक शुभेच्छा

## ✲ दैनंदिन / मासिक ठेव प्रतिनिधी ✲

**अंबरनाथ शाखा :**

| | |
|---|---|
| श्री.निलेश नारायण दळवी | मो. : ९८५०९४१५३३ |
| सौ.निवेदिता विलास शिंदे | |
| श्री.हरिष देवजी चिकणे | ✆ : २६००५३६ |
| सौ. माधुरी मनोहर जाधव | ✆ : ९४२३०८८४६५ |
| श्री.बापूराव भिमराव मेश्राम | मो. : ९८२२५१०३२२ |
| श्री.युवराज नागराज जैन | ✆ : ६५६०३९७ |
| श्री. बाळू रामदास पाटील | मो. : ९४२३३६७३१६ |
| सौ. सुष्मा हरिश्चंद्र येरूणकर | ✆ : २६०१५९५ |
| कु. योगिता सहदेव कडू | मो. : ९४२२०७८२५८ |
| श्री.अजित अशोक मांढरे | मो. : ९८२००९५६२४ |
| सौ.संजीवनी गणेश भारंबे | ✆ : २६०३९६२ |
| श्री. विश्वास तुकाराम शेंडे | |
| श्री. सुनिल भागोजी सावंत | |
| श्री. मिनाक्षी अशोक थोरात | |
| श्री. प्रदिप शंकर भोसले | मो. ९८२२३०७०७१ |

**बदलापूर शाखा :**

| | |
|---|---|
| सौ.स्नेहल जगदीश मोरे | मो. : ९४२३३६७५२२<br>✆ : २६९०९१७ |
| सौ.गितांजली जयवंत पाटील | |
| श्री. मलकान नथू पवार | |
| श्री.विरेंद्र बबन जगदाळे | मो. : ९८५०१७०९५७ |
| सौ. स्वाती कैलास पाटील | ✆ : २६७३३६५ |
| श्री. शिवप्रसाद गुप्ता | मो. : ९३२६०५२६३५ |
| श्री. सुभाष अरुण देशमुख | |
| श्री. अरुण ओंकार पाटील | |
| श्री. जयप्रकाश पाटील | |
| सौ. रुपाली चं. देसाई | |
| श्री. धोंडीराम शं. पाटील | मो. ९३२३८९६२९२ |

**डोंबिवली शाखा :**

| | |
|---|---|
| सौ. रजनी आ. धायगुडे | मो. ९८९२६५४६९३ |
| श्री. विलास शांताराम बेलोसे | मो. ९८३३२७५७२६<br>नि. २४०७०४० |
| सौ. मनिषा बाळू म्हात्रे | ✆ : २६४१४६३ |
| श्री. रघुनाथ धोंडू चौगुले | मो. ९३२२८९४६४७<br>✆ : २४०४८०३ |
| श्री. प्रकाश जगन्नाथ सुर्वे | ✆ : २८८१५२८ |
| सौ. उषा भास्कर दाबके | ✆ : ५३६१४४६ |
| सौ. श्रद्धा विश्वास शिंदे | |
| श्री. संजय अंकुश पाटील | |
| श्री. नितीन जगन्नाथ कदम | |

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ


सामाजिक बांधीलकीतून पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप
दि. १८-८-२००५





संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचे एक दिवशीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन
दि. १९-६-२००६





# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

## आकर्षक ठेव योजना !

**दरमहा नियमित १,३५७/- रु. भरा आणि लक्षाधिश व्हा !**

**दामदुप्पट ठेव - ८७ महिने (७ वर्षे ३ महिने)**

### महालक्ष्मी मुदत ठेव

| | | |
|---|---|---|
| ४५ दिवस ते १८० दिवस | - | ०६.०० % |
| १८१ दिवस ते ३६४ दिवस | - | ०८.०० % |
| १ वर्षापेक्षा जास्त ते २ वर्षे | - | १०.०० % |
| २ वर्षापेक्षा जास्त ते ३ वर्षे | - | ०९.५० % |
| ३ वर्षापेक्षा जास्त ते ५ वर्षे | - | ०९.०० % |

### महालक्ष्मी मासिक मिळकत ठेव

| | | |
|---|---|---|
| १ वर्ष | - | ०९.०० % |
| २ वर्ष | - | ०९.५० % |
| ३ वर्ष | - | १०.०० % |

### महालक्ष्मी मासिक ठेव

| | | |
|---|---|---|
| १ वर्ष | - | ०७.५० % |
| २ वर्ष | - | ०८.०० % |
| ३ वर्ष | - | ०८.५० % |

### महालक्ष्मी जनविकास ठेव

| | | |
|---|---|---|
| १ वर्ष | - | ०९.०० % |
| २ वर्ष | - | ०९.५० % |
| ३ वर्ष | - | १०.०० % |

### महालक्ष्मी बाल विकास ठेव



| | | |
|---|---|---|
| ६१ महिने | - | ०९.०० % |
| ७३ महिने | - | ०९.५० % |
| ७ वर्षे | - | १०.०० % |
| ८ वर्षे | - | ११.०० % |
| ९ वर्षे | - | ११.५० % |
| १० वर्षे | - | १२.०० % |

**दैनंदिन ठेव : १ वर्ष - ५ %   ६ महिने - ४ %**

प्रति -
श्री./सौ. ______________________

______________________

______________________

प्रेषक -
**श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ**
३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पु.),
जि. ठाणे - ४२१ ५०१. फोन : अंबरनाथ - २६०९७९०